खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### क्रीडा विभाग : वेटलिफ्टिंग आणि शरीरसौष्ठव स्पर्धा

# क्रीडानैपुण्य वाढविण्याचे आव्हान

## अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाकाळात महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्य निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडा शिक्षकांसमोर आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीअंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी पोलिस निरीक्षक सतीश गुरव, संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगळे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.

शरीरसौष्ठव स्पर्धेत ए.एस.सी. महाविद्यालय, इंदापूरने विजेतेपद पटकाविले. बाबूरावजी घोलप महाविद्यालयाच्या सुमितबाईजने 'बेस्टपोझर', तरसी.एस.अॅंड.सी. महाविद्यालय, माळेगावचा संकेत काळे याने आंतरमहाविद्यालयीन "श्री २०२०-२१" हा किताब संपादन केला.

नीलेश धावरे, सुमीत बाईज, काझी मोहम्मद सैफ, तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरू या खेळाडूंनी वेगवेगळ्या वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला. वेटलिफ्टिंगमध्ये इंद्रायणी महाविद्यालयाला विजेतेपद, तर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाला उपविजेतेपद मिळाले. सारिका शिनगारे, चेतना घोजगे, सृष्टी थोरात, प्रतीक्षा कड्, मृणाली भोंग, रुचिका ढोरे यांनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला.

वेटलिफ्टिंग मुलांमध्ये दिग्विजय गोटकुले, ऋषिकेश चव्हाण, सुमित दळवी, ओंकार बोरकर, किरण जगताप, वरद वाघ, वैष्णव ठाकूर, चिराग वाघुले, आयुष खंडागळे, अमित वाळुंज यांनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर या खेळाडूंनी 'बेस्ट लिफ्टर' हा किताब मिळविला. या स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्यांची आंतरविभागीय शरीरसौष्ठव व वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी झाली. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता डॉ. शीतल शेंडकर डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.

**दै. पुढारी**

सकाळ

# शरीरसौष्ठवमध्ये इंदापूर विजेते

## राजगुरुनगरमधील स्पर्धेत यश; वेटलिफ्टिंगमध्ये इंद्रायणी महाविद्यालय अव्वल

**राजगुरुनगर, ता. २० :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीअंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) स्पर्धेतील शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये ए. एस. सी. महाविद्यालय इंदापूर या संघाने विजेतेपद पटकाविले. बाबूरावजी घोलप महाविद्यालयाच्या सुमीत बाईज याला 'बेस्ट पोझर'; तर माळेगावच्या सी. एस. अँड सी. महाविद्यालयाच्या संकेत काळे याने आंतरमहाविद्यालयीन 'श्री २०२०-२१' हा मानाचा किताब संपादन केला.



**राजगुरुनगर (ता. खेड) : शरीरसौष्ठव स्पर्धेतील 'बेस्ट पोझर' सुमीत बाईज.**

या स्पर्धेतील शरीरसौष्ठव मुले स्पर्धेकरिता विविध महाविद्यालयातील २१; तर वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता ३५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. शरीरसौष्ठवमध्ये मुलांच्या गटात नीलेश धावरे, सुमीत बाईज, काझी मोहम्मद सैफ,तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरू या खेळाडूंनी वेगवेगळ्यावजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. वेटलिफ्टिंगमध्ये मुलींच्या गटात इंद्रायणी महाविद्यालयाने विजेतेपद; तर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाला उपविजेतेपद मिळाले. सारिका शिनगारे, चेतना घोजगे, सृष्टी थोरात, प्रतीक्षा कडू, मृणाली भोंग, रुचिका ढोरे या खेळाडूंनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. वेटलिफ्टिंगमधील मुलांच्या गटात दिग्विजयगोटकुले, ऋषिकेश चव्हाण, सुमीत दळवी,ओंकार बोरकर, किरण जगताप, वरद वाघ, वैष्णव ठाकूर, चिराग वाघुले, आयुष खंडागळे, अमित वाळुंज या खेळाडूंनी आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर या खेळाडूंनी 'बेस्ट लिफ्टर' हा किताब मिळविला.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, "कोरोनाकाळात शाळा व महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये पुन्हा क्रीडानैपुण्य निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडा शिक्षकांसमोर उभे ठाकले असून, त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी."

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी; तर प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. योगेश मोहिते यांनी आभार मानले.

Pune, District-Today
21/12/2021 Page No. 4



नवराष्ट्र

स्पर्धा | ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांचे प्रतिपादन

# विद्यार्थ्यांमध्ये क्रीडासंस्कृती जोपासावी

राजगुरुनगर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. कोरोनाकाळात शाळा-महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडाशिक्षकांसमोर उभे ठाकले आहे. त्यामुळे त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. एच. एम. जरे, डॉ. संजय शिंदे, कैलास पाचारणे, डॉ. सुनील पानसरे, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे उपस्थित होते.

## वेटलिफ्टिंगमध्ये इंद्रायणी महाविद्यालयाला विजेतेपद

वेटलिफ्टिंग मुली स्पर्धेमध्ये इंद्रायणी महाविद्यालयाने विजेतेपद तर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाला उपविजेतेपद मिळाले. सारिका शिनगारे, चेतना घोजगे, सृष्टी थोरात, प्रतिक्षा कड्डू, मृणाली भोंग, रुचिका ढोरे या खेळाडूंनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

## शरीरसौष्ठव स्पर्धेत एएससी महाविद्यालय विजते

शरीरसौष्ठव मुले स्पर्धेकरिता विविध महाविद्यालयातील २१ तर वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरीता ३५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये एएससी महाविद्यालय इंदापूर या संघाने विजेतेपद पटकाविले. बाबुरावजी घोलप महाविद्यालयाच्या सुमित बाईज याला 'बेस्ट पोझर', तर सीएसअँडसी महाविद्यालय, माळेगावचा संकेत काळे याने 'आंतरमहाविद्यालयीन 'श्री २०२०-२१' हा मानाचा किताब संपादन केला. निलेश धावरे, सुमीत बाईज, काझी मोहम्मद सैफ, तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरू या खेळाडूंनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला.

## शिनगारे, ठाकूर ठरले 'बेस्ट लिफ्टर'

- वेटलिफ्टिंग मुलांमध्ये दिग्विजय गोटकुले, ऋषिकेश चव्हाण, सुमित दळवी, ओंकार बोरकर, किरण जगताप, वरद वाघ, वैष्णव ठाकूर, चिराग वाघुले, आयुष खंडागळे, अमित वाळुंज या खेळाडूंनी आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला.
- सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर या खेळाडूंनी 'बेस्ट लिफ्टर' हा किताब मिळविला. या स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या खेळाडूंची निवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत २० व २१ डिसेंबर २०२१ रोजी सी. डी. जैन महाविद्यालय, श्रीरामपूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय शरीरसौष्ठव व वेटलिफ्टिंग स्पर्धेकरिता झाली आहे.
- शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता डॉ. शितल शेंडकर डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.
- सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी, तर आभार प्रा. योगेश मोहिते यांनी मानले.

Pune Plus Edition
20 December 2021 Page No. 3
epaper.navarashtra.com

लोकमत

देवेंद्र बुट्टे-पाटील : राजगुरु महाविद्यालयात वेटलिफ्टिंग व शरीरसौष्ठव स्पर्धा संपन्न

# विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा नैपुण्य वाढविण्याचे मोठे आव्हान

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** कोरोनाकाळात शाळा-महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्या होत्या. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा नैपुण्य निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडाशिक्षकांसमोर उभे ठाकले असून त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितींतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीरसौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगळे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. सुनील पानसरे, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील पुढे म्हणाले की, ज्यांना खेळामध्ये गती आहे तसेच स्वत:मधल्या सृजनशीलतेला वाव देण्याची इच्छा आहे त्यांच्यासमोर क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचे आगळेवेगळे क्षेत्रही करिअर म्हणून खुले आहे. जिद्द व चिकाटीच्या जोरावर क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश संपादन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या खेळाडूंची निवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत २० व २१ डिसेंबर २०२१ रोजी सी.डी. जैन महाविद्यालय, श्रीरामपूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय शरीरसौष्ठव व वेटलिफ्टिंग स्पर्धेकरिता झाली आहे.

शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता डॉ. शीतल शेंडकर डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.

## वेटलिफ्टिंग, शरीरसौष्ठव स्पर्धेतील विजेते

- शरीरसौष्ठव मुले स्पर्धेकरिता विविध महाविद्यालयातील २९, तर वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता ३५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये ए. एस. सी. महाविद्यालय इंदापूर या संघाने विजेतेपद पटकाविले. बाबूरावजी घोलप महाविद्यालयाच्या सुमित बाईज याला 'बेस्ट पोझर' तर सी.एस. अँड. सी महाविद्यालय, माळेगावचा संकेत काळे याने आंतरमहाविद्यालयीन श्री २०२०-२१ हा मानाचा किताब संपादन केला.
- शरीरसौष्ठव मुले स्पर्धेमध्ये नीलेश धावरे, सुमित बाईज, काझी मोहम्मद सैफ, तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरु या खेळाडूंनी वेगवेगळ्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला.
- वेटलिफ्टिंग मुली स्पर्धेमध्ये इंद्रायणी महाविद्यालयाने विजेतेपद, तर हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाला उपविजेतेपद मिळाले. सारिका शिनगारे, चेतना घोजगे, सृष्टी थोरात, प्रतीक्षा कड्डू, मृणाली भोंग, रुचिका ढोरे या खेळाडूंनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.
- वेटलिफ्टिंग मुलांमध्ये दिग्विजय गोटकुले, ऋषिकेश चव्हाण, सुमित दळवी, ओंकार बोरकर, किरण जगताप, वरद वाघ, वैष्णव ठाकूर, चिराग वाघुले, आयुष खंडागळे, अमित वाळुंज या खेळाडूंनी आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर या खेळाडूंनी 'बेस्ट लिफ्टर' हा किताब मिळविला.

Hello Pune Gramin
Page No. 3 Dec 19, 2021
Powered by: erelego.com

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# राजगुरु महाविद्यालयात वेटलिफ्टिंग व शरीर सौष्ठव स्पर्धा संपन्न

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**

**■ विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये वाढविण्याचे आव्हान : ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील**




कोरोनाकाळात शाळा - महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडाशिक्षकांसमोर उभे ठाकले असून त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. पी.डी.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. सुनील पानसे, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे तसेच विविध महाविद्यालयातून आलेले शारीरिक शिक्षण संचालक, मार्गदर्शक, खेळाडू व पंच उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, ज्यांना खेळामध्ये गती आहे तसेच स्वतःमधल्या सृजनशीलतेला वाव देण्याची इच्छा आहे त्यांच्यासमोर क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचे आगळेवेगळे क्षेत्रही करिअर म्हणून खुले आहे. जिद्द व चिकाटीच्या जोरावर क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश संपादन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. शरीरसौष्ठव मुले स्पर्धेकरिता विविध महाविद्यालयातील २१ तर वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता ३५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये ए. एस. सी. महाविद्यालय इंदापूर या संघाने विजेतेपद पटकाविले. बाबुरावजी घोलप महाविद्यालयाच्या सुमित वाईज याला बेस्ट पोझर तर सी.एस.ॲड.सी महाविद्यालय, मालेगावच्या संकेत काळे याने आंतरमहाविद्यालयीन 'श्री २०२०-२१' हा मानाचा किताब संपादन केला. शरीरसौष्ठव मुले स्पर्धेमध्ये निलेश धावरे, सुमीत वाईज, काझी मोहम्मद सैफ, तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरू या खेळाडूंनी वेगवेगळ्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला.

वेटलिफ्टिंग मुली स्पर्धेमध्ये इंद्रायणी महा विद्यालयाने विजेतेपद तर हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाला उपविजेतेपद मिळाले. सारिका शिनगारे, चेतना घोजगे, सृष्टी घोसाळ, प्रतिक्षा कडू, मृणाली मांग, संचिका डोंगरे या खेळाडूंनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. वेटलिफ्टिंग मुलांमध्ये शिवराज गोटकुले, ऋषिकेश चव्हाण, सुमित दळवी, ओंकार बोरकर, किरण जगताप, यश धाप, वैष्णव ठाकूर, चिराग वाघुले, आयुष खेडगाळे, अमित वाळुंज या खेळाडूंनी आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला.

या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर या खेळाडूंनी बेस्ट लिफ्टर हा किताब मिळविला. या स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या खेळाडूंची निवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत २० व २१ डिसेंबर २०२१ रोजी सी.डी.जैन महाविद्यालय, श्रीरामपूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय शरीरसौष्ठव व वेटलिफ्टिंग स्पर्धेकरिता झाली आहे. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता डॉ. शितल शेलकर, डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोखंडे तर आभार प्रा. योगेश मोहिते यांनी मानले.

HRMI

वर्ष : १४०
केसरी

# विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्य वाढविण्याचे आव्हान : अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** कोरोनाकाळात शाळा-महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडा शिक्षकांसमोर उभे ठाकले असून, त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडा संस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. सुनील पानसरे, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे तसेच विविध महाविद्यालयातून आलेले शारीरिक शिक्षण संचालक, मार्गदर्शक, खेळाडू व पंच उपस्थित होते.

शरीरसौष्ठव मुले स्पर्धेकरिता विविध महाविद्यालयातील २१ तर वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरीता ३५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये ए. एस. सी. महाविद्यालय इंदापूर या संघाने विजेतेपद पटकाविले. बाबुरावजी घोलप महाविद्यालयाच्या सुमित बाईज याला बेस्ट पोझर तर सी.एस. अँड. सी महाविद्यालय, माळेगावचा संकेत काळे याने अंतरमहाविद्यालयीन 'श्री २०२०-२१' हा मानाचा किताब संपादन केला. शरीरसौष्ठव मुले स्पर्धेमध्ये निलेश धावरे, सुमीत बाईज, काझी मोहम्मद सैफ, तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरू या खेळाडूंनी वेगवेगळ्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. आभार प्रा. योगेश मोहिते यांनी मानले.

पुणे आवृत्ती बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर येथून एकाच वेळी प्रसिध्द RNI No. MAHMAR/2013/57952

# विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये वाढविण्याचे आव्हान

राजगुरुनगर
जनप्रवास प्रतिनिधी



ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

कोरोनाकाळात शाळा–महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडाशिक्षकांसमोर उभे ठाकले असून त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. सुनील पानसरे, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे तसेच विविध महाविद्यालयातून आलेले शारीरिक शिक्षण संचालक, मार्गदर्शक, खेळाडू व पंच उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, ज्यांना खेळामध्ये गती आहे तसेच स्वत:मधल्या सृजनशीलतेला वाव देण्याची इच्छा आहे त्यांच्यासमोर क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचे आगळेवेगळे क्षेत्रही करियर म्हणून खुले आहे. जिद्द व चिकाटीच्या जोरावर क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश संपादन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता डॉ. शितल शेंडकर डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी तर आभार प्रा. योगेश मोहिते यांनी मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**